महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

**टोल फ्री क्रमांक : १०७७** **दुरध्वनी क्रमांक : ०२०-२६१२३३७१** **collector.pune@maharashtra.gov.in**

क्र.आ.व्य.कावि/कोविडलसीकरण/ /२०२१ दिनांक : / /२०२१

**वाचा :** १) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७.
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
३) मा.मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.डीएमयु-२०२०/प्र.क्र.९२/ आवयप्र-१/दिनांक ९/५/२०२०.
४) मा.मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील No.DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक १२/५/२०२१ रोजीची अधिसूचना.
५) या कार्यालयाकडील आदेश क्र.जिका/क्र.आ.व्य./कावि/९७३/२०२१ दिनांक १३/५/२०२१.
६) मा.सचिव, स्वास्थ्य एवं परिवार कल्याण विभाग भारत सरकार यांचेकडील पत्र क्र.D.O.No.T-22011/01/2021-Imm दिनांक २७/५/२०२१.
७) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा यांचे पत्र क्र. SFWB/desk12/Covid19 Vaccination elderly and disabled citizens/३२४३०-५२४ दिनांक २८/५/२०२१.
८) मा.अतिरिक्त संचालक,आरोग्य सेवा पुणे यांचे पत्र क्र.No.SFWB/desk12/Har Ghar Dastak for Covid Vaccination/७८८५६-९६१/२१ दिनांक ९.११.२०२१.

**अत्यंत महत्वाचे**
**प्रथम प्राधान्य**

**विषय :कोविड लसीकरण मोहिमे अंतर्गत दिनांक ३१ डिसेंबर २०२१ अखेरपर्यंत पहिला डोस १०० टक्के व दुसऱ्या डोसच्या सर्व पात्र लाभार्थ्यांचे लसीकरण पुर्ण करणेबाबत.**

## आदेश

**ज्याअर्थी** आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हे कोणतीही आपत्ती रोखण्यासाठी किंवा आपत्ती विरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आहेत. तसेच भारतीय साथरोग अधिनियम १८९७ व मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील No.DMU/2020/CR PRADHM-2, दि.२९.६.२०२० रोजीच्या आदेशामध्ये त्या त्या जिल्हयातील परिस्थिती प्रमाणे संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांना जिल्हयातील रुग्ण स्थितीनुसार आदेश काढणेबाबत सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

**आणि ज्याअर्थी** राज्यामध्ये व पुणे जिल्हयामध्ये केंद्र शासन व राज्य शासनाच्या प्राप्त मार्गदर्शक सुचनांप्रमाणे जानेवारी २०२१ पासून कोविड लसीकरण सुरु करण्यात आलेले आहे आणि दिनांक २७ मे २०२१ रोजीच्या केंद्र शासनाच्या व दिनांक २८ मे २०२१ रोजीच्या राज्य शासनाच्या निर्देशानुसार सर्व पात्र लाभार्थ्यांचे पहिल्या व दुसऱ्या डोसचे १०० टक्के लसीकरण पुर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. संदर्भ क्रमांक ८ नुसार सध्या **"हर घर दस्तक"** ही मोहिम राबविण्यात येत असून सदर मोहिमेस ३१.१२.२०२१ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीमध्ये पुणे जिल्हयाच्या ग्रामीण व नगरपालिका क्षेत्रामध्ये **पहिल्या डोसचे लसीकरण कामकाज ९८% टक्के व दुसऱ्या डोसचे प्रमाण ६२% टक्के एवढे आहे.** त्याचप्रमाणे पुणे जिल्हयात कोविड **लसीकरणाचा साठा शिल्लक असताना देखील** अद्यापही पुणे ग्रामीण व नगरपालिका भागातील बऱ्याचशा

पात्र लाभार्थ्यांचा कोविड लसीकरणाचा पहिला व दुसरा डोस प्रलंबित असल्याचे निदर्शनास आलेले असून आणि **वारंवार पाठपुरावा करुनदेखील लसीकरणाचे कामकाजाचा वेग कमी होणे ही बाब अत्यंत खेदाची आहे.**

**त्याअर्थी मी डॉ.राजेश देशमुख (भाप्रसे), अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, पुणे** मला प्राप्त अधिकारान्वये पुणे जिल्हयातील ग्रामीण व नगरपालिका भागातील सर्व पात्र पहिल्या डोसच्या लाभार्थ्यांचे १०० टक्के पहिला डोस व पात्र दुसऱ्या डोसच्या लाभार्थ्यांचे कोविड लसीकरण दिनांक ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत पुर्ण करणेकरीता खालील प्रमाणे सूचना देवून आदेश पारित करीत आहे. याकरीता **तहसिलदार** यांना **तालुका स्तरावर समन्वय अधिकारी** म्हणून घोषित करत असून जिल्हास्तरावर **जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी** यांना **जिल्हास्तरीय नोडल अधिकारी** म्हणून घोषित करीत आहे.

## अ) प्रा.आ.केंद्रस्तरीय नियोजन:

जिल्हयातील प्रा.आ.केंद्र स्तरावर खालीलप्रमाणे त्वरीत नियोजन करण्यात यावे.

**i) हर घर दस्तक मोहिमे अंतर्गत घरोघरी भेटी देणे :**

- प्रा.आ.केंद्र व उपकेंद्रनिहाय मोबाईल रुग्णवाहीकेव्दारे लसीकरण करणे अथवा गावातील शाळा, अंगणवाडी/आरोग्य संस्था याठिकाणी लसीकरण सत्राचे आयोजन करावे. यासाठी १०२ रुग्णवाहीकेव्दारे Pick up & Drop Back ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.
- कोविड लसीकरण केंद्राकरीता व्दितीय वैद्यकिय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, स्टाफ नर्स, एएनएम यांचा समावेश करावा.
- प्रा.आ.केंद्रांच्या रुग्ण कल्याण समितीने गावनिहाय / ग्रामपंचायत निहाय आराखडा तयार करुन आराखडया नुसार लसीकरण पुर्ण करुन घ्यावे. (उदा.प्रथम एक ग्रामपंचायत पुर्ण करावी नंतर दुसरी ग्रापं, नंतर तिसरी नंतर चौथी अशाप्रकारे)
- नियोजन करत असताना ज्याठिकाणी पहिल्या डोसचे प्रमाण अतिशय कमी आहे तेथून सुरुवात करावी व दुर्गम ठिकाणी मोबाईल रुग्णवाहीकेव्दारे लसीकरणाचे नियोजन करावे.
- ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका यांनी गृहभेटी व्दारे सर्वेक्षण करुन सर्व शिल्लक लाभार्थ्यांच्या गावनिहाय याद्या तयार कराव्यात.
- यादी तयार करीत असताना ग्रामसेवक,आरोग्य कर्मचारी,आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका यांनी सर्व पहिल्या डोसचे प्रलंबित व्यक्ती व दुसऱ्या डोसच्या पात्र व्यक्तींचा समावेश झाला असल्याची खात्री करुनच यादी अंतिम करावी.
- पहिल्या व दुसऱ्या डोसकरीता कोणताही पात्र लाभार्थी कोविड लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
- गृहभेटीव्दारे सर्वेक्षण करणेकरीता महिला मंडळे आणि गाव दक्षता समिती यांचे सहकार्य घेवून त्या-त्या कार्यक्षेत्रातील आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी कार्यकर्ती यांनी पूर्ण करुन घेण्यात यावे.

**ii) कामगार, मजूर व इतर नोकरदार व्यक्तीकरीता लसीकरणाचे विशेष नियोजन:**

- कामगार, मजूर व इतर नोकरदार व्यक्तींकरीता आठवडयातील शनिवार व रविवार या दोन दिवशी विशेष कोविड लसीकरण सत्रांचे आयोजन करण्यात यावे तसेच इतर दिवशी संध्याकाळी ९ वाजेपर्यंत या व्यक्तीं करीता कोविड लसीकरण सत्र सुरु ठेवण्यात यावीत.
- दिनांक ३१.१२.२०२१ नंतर कार्यक्षेत्रातील एकही कामगार, मजूर किंवा इतर नोकरदार व्यक्ती हे कोविड लसीकरणापासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

**iii) या आदेशान्वये लागू करावयाचे निर्बंध :**

- आपत्ती व्यवस्थापन कायदा, भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम व बॉम्बे पोलीस ॲक्ट १९५१ कलम ५६ (C) नुसार १८ वर्षावरील ज्या लाभार्थ्यांचे कोविड लसीकरण शिल्लक आहे अशा व्यक्तींना बंदिस्त ठिकाणी (उदा. शासकीय/खाजगी कार्यालये, विविध बँकांचे एटीएम, दुकाने, खाजगी कंपनी, औद्योगिक क्षेत्र, हॉल, ऑडीटोरियम वगैरे) प्रवेश बंद **(हॉस्पिटल व अत्यावश्यक बाब वगळून)** करण्यात यावेत.
- दुकानदार किंवा कंपनी प्रमुख हे यास पूर्णपणे जबाबदार असतील. अशा ठिकाणी नागरिकांचे **कोविड लसीकरण प्रमाणपत्र** बंधनकारक करण्यात यावे. कोविड लसीकरण **दुसरा डोस पुर्ण झालेले**, **Universal Pass** आणि **पहिला डोस घेतलेले परंतु ८४ दिवसाच्या आत असणाऱ्या व्यक्तींनाच** अशा ठिकाणी प्रवेश देण्यात यावा.
- या बाबीचा भंग झाल्यास आस्थापना मालक व संबंधित व्यक्ती यांना प्रत्येकी रक्कम रु. ५००/- चा दंड आकारण्यात यावा आणि संबंधित आस्थापना पुढील आदेशापर्यंत बंद करण्यात यावी. यामध्ये पुनरावृत्ती झ ाल्यास रक्कम रु. १०,०००/- चा दंड ठोठावण्यात यावा.

**iv) ग्रामपंचायत / नगरपालिकांनी करावयाचे नियोजन:**

- कोविड लसीकरण न झालेल्या पहिल्या व दुसऱ्या डोसच्या लाभार्थ्यांचा शोध घेवून त्यांना कोविड लसीकरण केंद्रांपर्यंत आणण्याची जबाबदारी ग्रापं/नपा यांची राहील. ग्रापं/नपा यांनी हाऊसिंग सोसायटी व स्थानिक रहिवासी येथील शिल्लक लाभार्थ्यांचा घरनिहाय शोध घेवून कोविड लसीकरण पुर्ण करुन घ्यावे. लाभार्थ्यांना लसीकरण केंद्रापर्यंत आणण्याकरीता वाहनाची व्यवस्था करण्यात यावी. वाहनासाठी ग्रापं/नपा अंतर्गत उपलब्ध असलेल्या अनुदानातुन खर्च करण्यात यावा.
- ग्रापं/नपा यांनी कार्यक्षेत्रातील कोविड लसीकरण पुर्ण करुन घेण्यासाठी सुरु असलेल्या कोविड लसीकरण सत्राची माहिती ग्रापं/नपा घंटागाडीव्दारे माईकींग करुन अधिकाधिक जनजागृती करण्यात यावी.
- दिनांक ३१.१२.२०२१ अखेर नंतर खाजगी कंपनी किंवा आस्थापना येथे काम करत असलेल्या व्यक्तींचे कोविड लसीकरण प्रलंबित राहणार नाही याची खाजगी कंपनी/ आस्थापना प्रमुख यांनी दक्षता घ्यावी, तद्नंतर तसे आढळून आल्यास कंपनी/आस्थापना यांचेवर आपत्ती व्यवस्थापन कायद्या अंतर्गत कारवाई करण्यात येईल.
- दिनांक ३१.१२.२०२१ नंतर ग्रापं/नपा कार्यक्षेत्रातील १८ वर्षावरील एकही लाभार्थी कोविड लसीकरणापासून वंचित राहणार याची दक्षता घेण्यात यावी.

**v) विशेष कोविड लसीकरण सत्र आयोजित करणे:**

- खाजगी कंपनी तसेच खाजगी आस्थापना यांनी आरोग्य विभागाशी समन्वय साधून कंपनी व आस्थापनेमध्ये कोविड लसीकरण सत्रे आयोजित करावीत.
- आपल्या आस्थापनेशी संबंधित सर्व व्यक्तींचे लसीकरण करुन घेण्याची जबाबदारी संबंधित आस्थापनेचे संस्थाचालक/खाजगी कंपन्यांचे मालक यांची राहील. सर्व आस्थापनांनी कोविड लसीकरणाकरीता आपल्या अधिनस्त एका अधिकाऱ्याची नेमणूक करावी व त्यांना पर्यवेक्षणाची संपूर्ण जबाबदारी देण्यात यावी.

## ब) प्रा.आ.केंद्रनिहाय प्रलंबित दुसरा डोस पुर्ण करण्याचे नियोजन:

- सद्यस्थितीत कोविन पोर्टलवरील स्थितीचे अवलोकन केले असता ग्रामीण भागातील ४.१७ लक्ष व्यक्तींना दुसरा डोस देणे प्रलंबित आहे असे दिसून येते.
- या लाभार्थ्यांनी पहिला डोस घेतल्यानंतर ८४ दिवस पुर्ण केले असून प्रशासकीय यंत्रणा अद्यापही या नागरिकांपर्यंत दुसरा डोस देण्यासाठी पोहोचलेली दिसून येत नाही. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | पहिल्या डोसचे प्रलंबित लाभार्थी | दुसऱ्या डोसचे प्रलंबित लाभार्थी | | अ. क्र. | तालुक्याचे नाव | पहिल्या डोसचे प्रलंबित लाभार्थी | दुसऱ्या डोसचे प्रलंबित लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आंबेगाव | ० | ४०,७०० | | ८ | खेड | ० | ५८,८६७ |
| २ | बारामती | ७०,६०८ | ५३,१५४ | | ९ | मावळ | ० | ५०,१६३ |
| ३ | भोर | ३२,३३६ | २७,३५४ | | १० | मुळशी | ० | ३६,८७९ |
| ४ | दौंड | ५०,७३६ | ४५,४४९ | | ११ | पुरंदर | ११,८५० | ४९,८४१ |
| ५ | हवेली | ४७,९६२ | ५३,८७० | | १२ | शिरुर | ० | ३०,३०९ |
| ६ | इंदापुर | ४०,६५० | ५९,६७४ | | १३ | वेल्हा | ० | ८,५६७ |
| ७ | जुन्नर | ७,८८३ | ३८,२८२ | | **एकुण** | | **२,६२,०२५** | **५,५३,१०९** |

- सर्व प्रशासकीय यंत्रणांनी लाभार्थी लसीकरण केंद्रांवर घेवून जाण्यासाठी आरोग्य विभागास मदत करावी आणि सर्व प्रलंबित लाभार्थ्यांचा दुसरा डोस तात्काळ पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात यावे.

उपरोक्त सूचनांनुसार आपापल्या कार्यक्षेत्रातील **"हर घर दस्तक"** मोहिमे अंतर्गत सर्व शिल्लक लाभार्थ्यांचे दिनांक ३१ डिसेंबर २०२१ अखेरपर्यंत कोविड लसीकरण पुर्ण करुन घेण्यात यावे. यापूर्वी दिलेल्या आदेशानुसार जिल्हयाकरीता व तालुक्याकरीता नियुक्त करण्यात आलेले नोडल अधिकारी हे आपापल्या कार्यक्षेत्रामध्ये कोविड लसीकरण कामकाजावर सनियंत्रण करतील व केलेल्या कामाचा अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडे सादर करतील. **"हर घर दस्तक" मोहिमे अंतर्गत एकही पात्र लाभार्थी कोविड लसीकरणापासून दिनांक ३१ डिसेंबर २०२१ नंतर वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. या उपरोक्त शिल्लक लाभार्थ्यांपैकी कोविड लसीकरणापासून लाभार्थी वंचित राहिल्यास त्या गावचे ग्रामसेवक, तलाठी, आरोग्य कर्मचारी व सर्व शासकीय यंत्रणेचे अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदार धरुन त्यांचे विरुध्द भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये प्रशासकीय कारवाई करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.**

**या आदेशाची सर्व प्रशासकीय यंत्रणाकडून गंभीर दखल घेण्यात यावी.**

**(डॉ.राजेश देशमुख)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,पुणे**

**प्रति,**

१) उपविभागीय अधिकारी सर्व.
२) तहसिलदार सर्व.
३) गटविकास अधिकारी,पंचायत समिती सर्व.
४) तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती सर्व.
५) वैद्यकिय अधिक्षक ग्रामीण/उपजिल्हा/स्त्री रुग्णालय सर्व.
६) मुख्याधिकारी, नगर पालिका सर्व.

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी:**

१) जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय औंध, पुणे.
२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.

**प्रत माहितीसाठी सस्नेह:**

१) पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण पुणे.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,पुणे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:**

१) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे.